श्री.कमलेशकुमार जैन, उद्योग उपसंचालक (तांत्रिक), गट-अ यांना त्यांच्या पूर्वाश्रमीच्या पदांच्या सेवा जोडून देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
शासन आदेश क्र. सेवाजो-२०२४/प्र.क्र.१०/उद्योग-३
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १४ फेब्रुवारी, २०२५

संदर्भ : १. उद्योग संचालनालयाचे पत्र क्र. उसं/आस्था/नियुक्ती/उ.अ./से.जो./२०२३/१२, दि.०३.०१.२०२४
२. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१
३. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१
४. वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेतन-१२८९/प्र.क्र.०२/९०/सेवा-३, दि.२३.०३.१९९४
५. वित्त विभाग शासन निर्णय क्र. अंनियो १००७/१८/सेवा-४, दि.०७.०७.२००७
६. वित्त विभाग शासन निर्णय अंनियो-२०१५/(NPS)/प्र.क्र.३२/सेवा-४, दि.०६.०४.२०१५

शासन आदेश :-

उद्योग संचालनालयाच्या आस्थापनेवरील उद्योग अधिकारी (तांत्रिक), गट-ब संवर्गामध्ये रुजू झालेल्या आणि सद्यस्थितीत उद्योग उपसंचालक (तांत्रिक), गट-अ या पदावर कार्यरत श्री. कमलेशकुमार जैन यांच्या पूर्वाश्रमीच्या शासकीय सेवा फक्त सेवानिवृत्ती उपदानाच्या प्रयोजनार्थ त्यांच्या विद्यमान सेवेस खालीलप्रमाणे जोडून देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहेत.

अ.क्र.	अधिकारी यांचे नाव	पूर्वीश्रमीचे पदनाम व वेतनश्रेणी	पूर्वीश्रमीच्या पदावर रुजू दिनांक	पूर्वीश्रमीच्या पदावरील सेवेचा कालावधी
१	श्री. कमलेशकुमार जैन	विक्रीकर निरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) (एस-१४ :३८६००-१२२८००)	दि.२५.११.२०१३	दि.२५.११.२०१३ ते दि.२८.०४.२०१५
		नायब तहसीलदार, गट-ब (एस-१५ : ४१,८००-१,३२,३००)	दि.०२.०५.२०१५	दि.०२.०५.२०१५ ते दि.२७.०९.२०१९

१. श्री. कमलेशकुमार जैन यांची प्रथम नियुक्ती दि.०१.११.२००५ नंतरची असल्याने त्यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू राहील तसेच वित्त विभाग शासन निर्णय दि.०७.०७.२००७ आणि दि.०६.०४.२०१५ मधील तरतुदींनुसार श्री. जैन यांना देण्यात आलेला निवृत्तीवेतन लेखा क्रमांक बदलणार नाही तसेच त्यांच्या अंशदानाच्या वसूलीबाबत त्यांच्या वेतन देयक नोंदवहीत व सेवापुस्तकात नोंद घेण्यात यावी.

२. श्री. जैन यांच्या वेतननिश्चितीबाबत वित्त विभाग शासन निर्णय दि.२३.०३.१९९४ आणि महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम क्र. ११ (२) (ए) मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

३. श्री. जैन यांची पूर्वीच्या पदावरील रजा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ च्या नियम २१ नुसार नवीन पदावरील रजेच्या हिशोबात जमा करण्यात यावी.

४. उपरोक्त नमूद मुद्द्यांच्या अनुषंगाने श्री. जैन यांना त्यांच्या पूर्वीश्रमीच्या सेवा जोडून देण्याबाबत उद्योग संचालनालयाने कार्यवाही करावी.

५. सदर शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.४४८/सेवा-७, दि.३१.१२.२०२४ अन्वये देण्यात आलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२५०२१४१११८१५१०१० असा आहे. हा आदेश निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHASHANK TUKARAM CHAVAN

Digitally signed by SHASHANK TUKARAM CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY LABOUR AND MINING DEPARTMENT, 2.5.4.20=7dd1791f8c7f2d8cbabbae6c3c11ac3d4fe93ccab49daf36ff24dacd585e2276, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A089DF063F1FFA9C6E2D052DB3C26C5B1ECE40048A4A7D39615BEE66D9E2053D, cn=SHASHANK TUKARAM CHAVAN
Date: 2025.02.14 11:19:17 +05'30'

(शशांक चव्हाण)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४. निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
५. श्री. कमलेशकुमार जैन, उद्योग उपसंचालक (तांत्रिक), गट-अ
६. निवडनस्ती (उद्योग-३)